सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९

# मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४७

( दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारलेला )

**Bombay Act No. XIX of 1947**

# THE BOMBAY HINDU WOMEN'S RIGHTS TO PROPERTY (EXTENSION TO AGRICULTURAL LAND) ACT, 1947

**( As modified up to 16th November, 2006 )**

[व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.]

२००६

( किंमत : रुपये ४.६० )

वि (एच) १२५२

## [ सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ ]

## मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४७

### अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव व व्याप्ती. | .. | १ |
| २ | सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ निरसित करणे. | .. | १ |
| ३ | सन १९३७ चा अधिनियम क्रमांक १८ व सन १९३८ चा अधिनियम क्रमांक ११ यांमधील "मालमत्ता" या संज्ञेत शेत जमिनीचा समावेश करणे. | .. | १ |




वि (एच) १२५२

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९[१]

**[ मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४७ ]**

[ २५ एप्रिल, १९४७ ]

**मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४२ निरसित करण्यासाठी, आणि त्याचे कलम २ पुन:अधिनियमित करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** भारत सरकार अधिनियम, १९३५ याच्या कलम ९३ च्या पोट-कलम (४) च्या तरतुदी विचारात घेता, मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४२ निरसित करणे, आणि त्याचे कलम २ पुन:अधिनियमित करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— **२६ जीइओ ५ प्रकरण-२. १९४२ चा मुंबई १७.**

**संक्षिप्त नाव व व्याप्ती.** १. (१) या अधिनियमास, मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४७, असे म्हणावे.

(२) तो, मुंबई प्रांतास लागू असेल.

**सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ निरसित करणे.** २. मुंबई हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (शेत जमिनीस लागू करणे) अधिनियम, १९४२ याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **१९४२ चा मुंबई १७.**

**सन १९३७ चा अधिनियम क्रमांक १८ व सन १९३८ चा अधिनियम क्रमांक ११ यांमधील "मालमत्ता" या संज्ञेत शेत जमिनीचा समावेश करणे.** ३. हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क अधिनियम, १९३७ व हिंदू महिलांचे मालमत्तेचे हक्क (सुधारणा) अधिनियम, १९३८ मुंबई प्रांतास लागू असताना, त्यामधील "मालमत्ता" या संज्ञेत शेत जमिनीचा समावेश असेल, आणि त्याचा नेहमीकरिता समावेश असल्याचे मानण्यात येईल: **१९३७ चा मुंबई १८. १९३८ चा मुंबई ९.**

परंतु, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टींमुळे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विशेष कायद्याद्वारे शेत जमिनीमधील कुळांच्या हक्कांसाठी विहित केलेल्या कोणत्याही उत्तराधिकाराच्या नियमास बाधा येणार नाही.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९४७, भाग-पाच, पृष्ठ-२९ पहा.



येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.